वितरण आदेश क्र. १२

**डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेंच्या ६० महिला प्रशिक्षणार्थी क्षमतेच्या वसतीगृह इमारतीच्या बांधकामास उर्वरित निधी वितरित करणे.**
**सहायक अनुदान - सन २०१७-१८ ( योजनांतर्गत )**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :विप्रप्र -२०१८/प्र.क्र.२९/१८/१२-अ,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक १४ मार्च, २०१८

वाचा : १. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं/ २०१७ प्र.क्र.६८/अर्थ,३ - दि.१ एप्रिल, २०१७.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. - बीयुडी-२०१७/ प्र.क्र.७० /२०१७/२५, दि.५ एप्रिल, २०१७.
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं/ २०१७ प्र.क्र.७५/अर्थ,३ - दि.१८ एप्रिल, २०१७.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०१७/ प्र.क्र.७० /२०१७/२५, दि.२० एप्रिल, २०१७.
५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं२०१७ /प्रक्र.९४/ अर्थसं-३ दि.३० जून, २०१७.
६. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०१७/ प्र.क्र.७० /२०१७/२५, दि.५ जुलै, २०१७.
७. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.विप्रप्र २०१३ /प्रक्र.९३/१३/१२-अ दि. ४ सप्टेंबर, २०१३.
८. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. विप्रप्र २०१३ / प्रक्र.९३/१३ १२-अ दि.२४ ऑक्टोबर, २०१३.
९. संचालक, डॉ .पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकिय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी अमरावती यांचे क्र. ६९/प्रशा/ माहिती/आस्था २०१/८ दि.२२.१.२०१८ रोजीचे पत्र.

**शासन निर्णय :-**

डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेंस संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन परिपत्रकान्वये मागणी क्र.ए-४, मुख्य लेखाशीर्ष २०७०-इतर प्रशासनिक सेवा ००३ -प्रशिक्षण-राज्य योजनांतर्गत योजना (००) (०५) डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेस सहायक अनुदान ( २०७००६८४ ) ३१ सहायक अनुदान ( वेतनेतर ) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता एकूण रु.४०१.०० लाख इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. संदर्भाधीन क्रमांक २ च्या शासन परिपत्रकान्वये **एप्रिल व मे, २०१७ या दोन महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी** लेखाअनुदान मंजूर करण्यात आले होते. यामधून आतापर्यंत कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

संदर्भाधीन क्रमांक ३ च्या शासन परिपत्रकान्वये सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या योजनांतर्गत खर्चासाठी संपूर्ण अनुदान नियंत्रक अधिकाऱ्यांच्या स्वाधिन करण्यात आले आहे. संदर्भाधीन क्र.५ व ६ च्या परिपत्रकानुसार एकूण अर्थसंकल्पीय अनुदानाच्या ८०% च्या मर्यादेत रु.३२०.८० लाख इतके सहायक अनुदान खर्चाकरिता, अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यापैकी, संस्थेच्या ६० महिला प्रशिक्षणार्थी क्षमतेच्या वसतीगृह इमारतीसाठी उर्वरित वितरित अनुदान रु.१२३.५५ लाख इतका निधी वजा केल्यानंतर रु.१९७.२५ लाख इतका निधी वितरित करण्यासाठी शिल्लक आहे.

२. संस्थेच्या प्रस्तुत कामास संदर्भाधीन क्र.७ च्या शासन निर्णयान्वये रु. १,९३,५९,००० /- ( अक्षरी रुपये एक कोटी, त्र्याण्णव लाख, एकोणसाठ हजार फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकास नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्र.८ च्या शासन निर्णयान्वये रु.९७,००,०००/- (अक्षरी रुपये सत्याण्णव लाख फक्त ) इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

संस्थेने, संदर्भाधीन क्र.९ च्या पत्रान्वये या कामाच्या अनुषंगाने सदर बांधकाम पूर्ण झालेले असल्याचे कळविले असून, त्या कामासाठी उर्वरित निधीची मागणी केली आहे.

३. त्यास अनुसरुन आता, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेंच्या ६० महिला प्रशिक्षणार्थी क्षमतेच्या वसतीगृह इमारतीच्या बांधकामासाठी ढोबळ अंदाजपत्रक व आराखडयाच्या रु. १,९३,५९,००० /- ( अक्षरी रुपये एक कोटी, त्र्याण्णव लाख, एकोणसाठ हजार फक्त ) इतक्या रक्कमेच्या दिलेल्या प्रशासकीय मान्यतेस अधीन राहून, यापूर्वी वितरित केलेले रु.९७,००,०००/-( अक्षरी रुपये सत्याण्णव लाख फक्त ) इतके सहायक अनुदान वजा जाता, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर योजनांतर्गत खर्चासाठी उपलब्ध असलेल्या रु.१९७.२५ लाख इतक्या निधीपैकी प्रस्तूत कामासाठी आता उर्वरित रु. ९६,५९,०००/- ( अक्षरी रुपये शहाण्णव लाख, एकोणसाठ हजार फक्त ) इतका निधी खालील अटींच्या अधीन राहून योजनांतर्गत सहायक अनुदान म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

१. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांनी , संचालक, यांना सदर बांधकाम पूर्ण झाल्याचे कळविल्यामुळे, सदर इमारतीची O.C. प्राप्त करुन घेऊन इमारत वापरण्यास सुरुवात करण्यात आली आहे. याबाबतचे प्रमाणपत्र शासनास सादर करणे बंधनकारक असेल.

२. सदर वसतीगृहाचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ ७२३.७४ चौ.मी. असून, इमारतीच्या ( G +1 ) या ऐवजी बांधकाम क्षेत्रफळाच्या मर्यादेत संपूर्ण तळमजल्याचे बांधकाम केलेले असल्यामुळे, सदर इमारत बांधकाम महिला वसतीगृहासाठीच उपयोगात येणार असल्याबाबत बंधनकारक असेल.

४. यासाठी होणारा खर्च, मागणी क्र.ए-४, मुख्य लेखाशीर्ष २०७०-इतर प्रशासनिक सेवा ००३ -प्रशिक्षण-राज्य योजनांतर्गत योजना ( ०० ) (०५ )डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेस सहायक अनुदान ( २०७००६८४ ) ३१ सहायक अनुदान ( वेतनेतर ) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

५. सदरहू मंजूर करण्यात आलेले अनुदान संबंधित कोषागारातून काढून घेतल्यानंतर, काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शिर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र विहित वेळेत शासनास सादर करावे.

६. आता वितरीत करण्यात येत असलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र (UTILIZATION CERTIFICATE ) डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती महालेखापाल, लेखापरीक्षा- महाराष्ट्र २, नागपूर यांना आणि शासनास तातडीने सादर करावे.

७. उपरोक्त अनुदानातून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार महालेखापाल, लेखापरीक्षा- महाराष्ट्र २, नागपूर यांना राहतील आणि त्याकरीता संबंधित संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं/२०१७ प्र.क्र.७५ /अर्थ -३, दि.१८ एप्रिल, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे. त्या परिपत्रकातील परिच्छेद ९ मधील नमूद अटीची व परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मधील १ ते ४ नमूद अटींची पूर्तता होत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१४११५६२३६६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijaykumar Parshuram Soshte

Digitally signed by Vijaykumar Parshuram Soshte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=106ede43bb7dcc67e6404aaa146fb4c17a872b3754b63c343b66d6b91dd6b276, cn=Vijaykumar Parshuram Soshte
Date: 2018.03.14 12:00:34 +05'30'

( वि.प.सोष्टे )
**कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग.**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई,
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर,
३) विभागीय आयुक्त, अमरावती
४) संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती
५) उप संचालक, लेखा व कोषागारे, अमरावती
६) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
७) नियोजन विभाग, कार्यासन-१४४३
८) वित्त विभाग (व्यय-४/ अर्थसंकल्प १४), मंत्रालय, मुंबई
९) अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्रमांक-२५. मंत्रालय, मुंबई
१०) अ.मु.स. (सेवा ) सामान्य प्रशासन विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
११ ) निवड नस्ती. (सामान्य प्रशासन विभाग/कार्या. १२ अ)